# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

(दि. २३ जुलै, १८५६ - १ ऑगस्ट, १९२०)

(अल्प परिचय)

थोर भारतीय नेते, *भगवद्गीते*चे आधुनिक भाष्यकार व प्राच्यविद्या पंडित. टिळकांचा जन्म चिखलगाव, तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी येथे झाला. त्यांचे जन्मनाव केशव परंतु पुढे बाळ हेच नाव रूढ झाले. टिळकांचे वडील गंगाधरपंत व आई पार्वतीबाई. सन १८७२ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. तत्पूर्वी सन १८७१ मध्येच त्यांचा सत्यभामाबाईंशी विवाह झाला. सन १८७६ मध्ये टिळक बी.ए. पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. नंतर त्यांनी एल्.एल्.बी. ही पदवी घेतली.

डेक्कन कॉलेजमध्येच टिळक आणि आगरकर यांचा स्नेह जमला. दोघांनी देशकार्याला वाहून घेण्याचा संकल्प केला. दि. १ जानेवारी, १८८० रोजी "न्यू इंग्लिश स्कूल"ची स्थापना झाली. चिपळूणकर, टिळक व आगरकर यांनी सन १८८१ मध्ये "आर्यभूषण" छापखाना काढला आणि "*केसरी*" (मराठी) व "*मराठा*" (इंग्रजी) ही दोन वृत्तपत्रे सुरू केली. प्रारंभी आगरकर "*केसरी*"चे व टिळक "मराठा"चे संपादक होते. वृत्तपत्रांच्या द्वारे लोकशिक्षण, राजकीय जागृती व शासकीय अन्यायाचा प्रतिकार हे त्यांचे ऐतिहासिक कार्य येथूनच सुरू झाले.

सन १८८४ मध्ये टिळक-आगरकरांनी "डेक्कन एज्युकेशन सोसायटी"ची स्थापना केली आणि या संस्थेतर्फे सन १८८५ मध्ये "फर्ग्युसन महाविद्यालयाची" स्थापना करण्यात आली.

"स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच", या भूमिकेपर्यंत लोकांना नेण्याचे कार्य, हा लोकमान्यांचा संकल्प होता. *केसरी* व *मराठा*तील तेजस्वी लेखांनी तसेच प्रखर भाषणांनी लोकजागृतीचे कार्य त्यांनी प्रभावीपणे केले. लोकजागृतीची साधने म्हणून गणपती व शिवजयंती या उत्सवांना सार्वजनिक स्वरूप देण्याची कल्पना पुढे आली.

टिळकांनी "राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नव्हे", "सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?" असे एकापाठोपाठ एक प्रखर लेख लिहिले. परिणामतः त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यात येऊन अठरा महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. टिळक मोठे विद्वान म्हणून शिक्षा करणे बरे नव्हे, असे मॅक्स म्यूलर यांनी सरकारला सांगितले, त्यामुळे त्यांपैकी सहा महिने शिक्षा सरकारने कमी केली व ते दि. ६ सप्टेंबर, १८९८ रोजी तुरुंगातून मुक्त झाले. शिक्षा भोगूनही त्यांच्या ध्येयधोरणांत बदल झाला नाही.

दि.२४ जून, १९०८ रोजी टिळकांना मुंबईत राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक होऊन त्यांच्यावर खटला भरण्यात आला. कोर्टाने त्यांना सहा वर्षे काळे पाणी व रु.१,०००/- दंडाची शिक्षा फर्मावली. टिळकांना झालेल्या या शिक्षेच्या निषेधार्थ

मुंबईत गिरणी कामगारांनी प्रथमच हरताळ पाळला, काळ्या पाण्याच्या शिक्षेसाठी टिळकांना ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात ठेवण्यात आले. मंडालेच्या तुरुंगात असताना त्यांनी आपला "*गीतारहस्य*" हा अत्यंत मौलिक ग्रंथ लिहिला. सहा वर्षांच्या कारावासानंतर इंग्रज सरकारने त्यांना मुक्त केले.

टिळकांचे काही दिवसांच्या आजारानंतर मुंबईत सरदारगृह येथे दि.१ ऑगस्ट, १९२० रोजी देहावसान झाले. टिळकांच्या मृत्यूची बातमी वाऱ्यासारखी मुंबईत व देशभर पसरली. सारा देश दुःखाच्या सागरात लोटला गेला.

******

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)